ा. सं. ठाणें
काव्य

आ. ना. पेडणेकर

# गीतांची शाळा



REFBK-0015571
REFBK-0015571

१९३७
७३६७५
२।३।६७
६३५
१९६६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ७३६७५ वि:
क्रमांक नोंद दि. १५।८।६७.

# गीतांची गाणी

अ. ना. पेडणेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५५८७
दा. क. ........
संग्र ... शाखा ... १५८

अभिनव प्रकाशन, मुंबई १२.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना

REFBK-0015571
REFBK-0015571

प्रकाशक : वामन विष्णु भट
**अभिनव प्रकाशन**
७ अंबा सदन, जेरबाई वांडिया रोड,
परळ, मुंबई १२.

□ □

प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९६६

□ □

© आ. ना. पेडणेकर

□ □

चित्रकार : बाळ ठाकूर

□ □

**किंमत दोन रुपये**

□ □

मुद्रक : चिंतामण वामन जोशी
**माधव प्रिंटिंग प्रेस**
अलिबाग, जि. कुलाबा.

घेनू, जया, भाई, बाबल, वसंत, अमृतराव,
पां. श्री., व्ही. आर्., स. शां., टी. एस्., भाऊ....
या मालवण येथील शिक्षकांच्या
निरपेक्ष स्नेहास—

# उ प स्थि ती


गड्यांनो, फेकून द्या दप्तरे
कां ?
हुतुतूचा सामना
सुट्टीची नोटीस
पाठांतर
शाळेची घंटा
परीक्षा झाल्यावर
ही परीक्षा
प्रगति-पुस्तक
भाषण पहिले
निबंधाची वही
आमिष
माझ्यासाठी
चित्रकार
शाळेचा वार्ताफलक
व्याख्यान
शेवटचा पेपर
गैरहजर
शाळेचा प्यून
निरोपाचा दिवस
बाकांचे गाणे
उद्या परवा
एक संवाद
नवे वर्ष—नवा वर्ग
इतिहासाचा तास
मधली सुट्टी
सांस्कृतिक कार्यक्रम
हे असेच व्हावे
शेवटल्या बाकावर
खडूची कांडी
हस्तलिखिताची तयारी
वार्षिक तपासणी
कवाईत
सहलीस जायचे
गणवेष
पारितोषिक-वितरण

# गीतांची शाळा



# गडयांनो,
# फेकुन द्या दप्तरे !

९५५६९

गड्यांनो, फेकुन द्या दप्तरे !

ह्या पाऊलवाटा दूर दूर धावती
टेकड्यांवरूनी आम्हा बोलाविती
त्या माळावरती रानफुले हासती
पाहुया चला ती तरंगती पाखरे....
गडयांनो, फेकुन द्या दप्तरे !

तो दूर उभा वड पारंब्या हलवीत
तेथेच रंगते पाव्याचे संगीत
पलिकडल्या बाजुस आहे का माहीत ?
झुळझुळत राहती निळे हासरे झरे....
गडयांनो, फेकुन द्या दप्तरे !

आकृत्या, बेरजा असु द्या फलकावरी
अक्षरे राहु द्या पुस्तकीच ती बरी
नभ निळे पाहिले आहे का कधितरी
ते नवरगांनी नटलेले साजिरे ?....
गडयांनो, फेकुन द्या दप्तरे !

हा वारा फिरतो शीळ मुक्त घालतो
कवडसा खोडकर भिंतीवर सरकतो
कुणि:पतंग करुनी मेघांचे उडवितो
नशिबात आमुच्या कां ही प्रश्नोत्तरे ?....
गडयांनो, फेकुन द्या दप्तरे !

# कां ?

ही वेल तोलते किती फुलांचे तुरे
वृक्षावर तरि ही कशी भराभर चढे

फांद्यांवर खारी, वानर अन् पाखरे
घेऊन उभी ही झाडे– नवलच खरे !

ती प्रचंड शिंगे म्हैस तोलते कशी ?
किति सहज मजेने कुंपणास दे ढुशी !

मोराचा नखरा अजबच आहे खरा
सावरी पिसारा, डोक्यावरती तुरा

देठाने इवल्या सूर्यफूल झेलले
हा किडा केवढा घेऊन मुंगी पळे

–जड झाली माझी मलाच की पावले
ओझ्यासम वाटे दप्तर का चिमुकले !

## हुतुतूचा सामना

सामना चालला हुतुतूचा जोरात
बघणारे धरती रोधुन अपुला श्वास

वाघासम घुसतो हेरुनिया भक्ष्यास
ती इवली मूर्ति.... विळखा घे पायास....

कोसळे खालती.... चुकली हद्द जराशी
हा माड डोलतो, जिरेल याची खाशी !

विदुषकापरी हा उगाच नखरे करतो
खेळता खेळता सूर तयाचा विरतो

धिप्पाड भीम हा गेला रेषेवरती
मारून पळे बघ थपडा दोघांवरती

खेचून आणले याने की चौघांना
त्या कोपऱ्यातल्या भिडूस धाडुन द्या ना....

याने न स्पर्शिली मधली रेषा मुळिही
किरकोळ भिडू पण उडी मारुनी जाई

रे सावध ! आला हत्ती डुलवित अंग
देईल लोण ते निश्चित दिसतो रंग—

जय-पराजयाची करोत अरसिक गणती
खेळाची मस्ती केवळ अमुच्या चित्ती !



## सुट्टीची नोटीस

अवचित आला पाऊस, घेउन सुट्टीची नोटीस !
आल्जेब्र्यातुन सहज पडावे मोराचे की पीस

रविवारी शिकवाया उत्सुक
तास बुडवणे महान पातक

हेडसरांच्या घरी निघाले धर्मकार्य का खास ?
अवचित येता पाऊस दिधली सुट्टीची नोटीस

छत्र्या होत्या– पण मिटलेल्या
भिजावयाला घाबरलेल्या

चुंबक आम्ही– भिडला आम्हां जलबिंदूंचा कीस !
अवचित आला पाऊस घेउन सुट्टीची नोटीस

पाठच नव्हती केली कविता
निबंध आला नाही लिहिता

भाग फुलांचे घोकुन, झाले होते कासावीस....
अवचित येता पाऊस, आली सुट्टीची नोटीस

अनवाणी पायांनी नाचुन
नद्या–कालवे नेऊ खोदुन

पडलो तर गुडघ्यांना लावू ऊन मऊ पोटीस....
अवचित आला पाऊस घेउन सुट्टीची नोटीस

नवे डिझाइन गणवेषावर
नवी प्रार्थना अन् ओठावर

गड्या पावसा, घे सुट्टी, ये उद्या याच क्षणास....

अवचित आला पाऊस घेउन
सु ट्टी ची नो टी स

## पाठांतर

जरुरीच असे का कवितांची ह्या आई ?
लिहितसे कोण हे ! कामच त्याला नाही ?

बाजूस सोडली किती मोकळी जागा–
की येतच नाही त्याला खूप लिहाया ?

ओळीत अक्षरे कशी सारखी बघ ही
कमजास्त एकही अक्षर अगदी नाही !

हे असे कुणी का बोलत असते जगती ?
येईल तुला का असे बोलता आई ?

हे पाठ कराया सांगितले गुरुजींनी
वाचतो सारखे... ध्यानी राहत नाही

मज आठवते गे रानातील सकाळ
कुहूकुहू, लकेऱ्या अन् घुमणारी शीळ

–बनतात अक्षरे रानपाखरे भित्री
धरणार कशी मी ? दूर उडूनी जाती...

# शाळेची घंटा

वर्षामागुन वर्षे गेली....
फळासारखी झुलते आहे....
निनादता मी
मुकाट जाती वर्गामध्ये....
कुणी धावती रस्त्यावरुनी....
अखेरच्या तासाला कितिदा
स्वप्नामध्ये निनादते मी....
वाट पाहती मम हाकेची
प्राण आणुनी कानामध्ये....
हाक ऐकता
उत्साहच ये
धावत सारा वर्गामधुनी
घरा गाठण्या धांदल-घाई
हाका माझ्या विरण्याआधी
कितीक जाती हाकेपुढती....
मी तर नांदी....
मीच भैरवी
मध्यंतरिची मी विश्रांती !
स्वस्थ बसुनी हुकूम देते
म्हणून माझा करता हेवा ?
तप्त उकळत्या रसामधूनी
जन्म घेतला
जीव सदाचा इथे टांगला
जि
व
त
फा
शी !

सुट्टीमध्ये चैन न पडते
झुळुका येती....चिमण्या येती
कोळी अपुली जाळी विणती....
सळसळत्या पानी
शीळ ऐकते
खूप वाटते
गीत म्हणावे....लकेर घ्यावी
रिते करावे अंतर सारे....
मौन छळीते....
ऐकत बसते
मम भगिनींचे बोल धावते....
कुणी दुचाकीवरुनी फिरती
हातगाडिवर कोणी बसती
देवळात कुणि स्तोत्रे गाती...
कुणी तरी या
शब्द मला द्या
मज गाऊ द्या....

# परीक्षा झाल्यावर

छळूनिया रात्रंदिन
गेली परीक्षा राक्षसी
' कसे गेलेत पेपर ? '
कितिदा ग विचारिशी ?

झाले नवीन आताशा
शुद्धलेखन मराठी,
वाचताना परीक्षक
घालणार भाळी आठी.



विज्ञानाच्या पेपरात
लाविलेत नवे शोध !
मला प्रश्न पडे आता—
होईल का त्यांना बोध ?

इतिहास लिहिताना
होतो करीतच धावा
' असे असे घडायला
हवे होते तेव्हा देवा '

गणिताच्या दिवशीच
आले चावून पोटात
संस्कृताची सारी रूपे
फक्त राहिली खिशात !

अर्धी वाचून काढली
इंग्रजीची प्रश्नावली,
थोडी लिहिली उत्तरे....
थोडी स्पेलिंगे चुकली

हिंदी लिहिताना शब्द
कैक नवीन पाडले,
राष्ट्रभाषा-प्रसाराचे
पुण्य सहज जोडले !

चित्रे सुरेख काढली—
( बंडू शेजारीच होता )
शारीरिक शिक्षणाला
नाही चालल्या ग बाता.

माझ्या मनी रेंगाळतो
निकालाचा दीस गोड—
जेव्हा म्हणतील अण्णा,
' बाळ्या, आता शाळा सोड. '



## ही परीक्षा—

ही परीक्षा रक्त शोषी-ना दया ये आज कोणा
सक्तमजुरी वाटते की पुस्तके ही घोकताना.

स्टोव्ह पेटे सारखा हा स्फूर्ति द्याया देइ कॉफी
झोप येता लावतो मी सारखे डोळ्यांस पाणी....

मध्यरात्री झोप जावी याचसाठी मी फिरावे
फिल्मगीते ऐकुनीया मस्तकाला जागवावे

मी करी चर्चा सदा संभाव्य प्रश्नांची मुलांशी
शिक्षकांच्या अन् घरीही जाउनीया मार्ग शोधी

भक्त होई याच काळी....लाच देवा देत राही
गाइडांची रोज पूजा....(त्याविना आधार नाही)

आज पश्चात्ताप होतो....चूक मोठी जाहली की !
पास होता यापुढे कर्णार मी अभ्यास नक्की

हासताती पुस्तके अन् चैन माझी आज छळते
राबणारी प्रेममूर्ती मायमुद्रा आज स्मरते

# प्रगति-पुस्तक

प्रगती पुस्तक....गतजन्मीचे पाप उभे हे
कसे द्यायचे बाबांजवळी? संकट मोठे!

पोर बिघडला म्हणतील आठ्या घालुन भाळी
माहित त्यांना शिक्षेच्या त्या अनंत रीती!

काठावरही पास न झालो....(हरेक विषयीं)
महिन्यामध्ये गैरहजेरी वेळोवेळी

लाल शाइचे शेरे माझे पाप बोलतिल
बदल करू का? नको नको ते....ध्यानी येइल...

मीच करू का सही? नको ते कळेल त्यांना
आईकरवी धाडुन देइन....घाईत असता....

आज वाटते....ताप भरावा....शुद्ध नसावी
अन् बाबांनी चिंता वाटुन क्षमा करावी

## भाषण पाहिले—

उभा राहिला भाषण तो करण्याला
प्रारंभच पण स्मरणामधुनी गेला

हातामधुनी कागद त्याच्या पडला
‘ भिऊ नको मुळि ’ कुणी तरी पुटपुटला

कुणी आणिले मुद्रेवर गांभीर्य
कुणी शरमले बघून त्याचे ‘ शौर्य ’

किति काळ उभा तिथे राहिला नकळे
परंतु त्याला युगे लोटली गमले

पुटपुटला जे त्यालाही नच कळले
शरीर सारे घामाने डबडबले

कंठामधले शब्द असे कां सुकले ?
फांदीवरचे भिरे क्षणी कां दडले ?

भाषण पहिले पडु दे जर ते पडले
रोप आज हे उभे राहण्या शिकले

या रोपाला उद्या फळे धरतील
कधी तरी हा होइल वक्ता थोर !

# निबंधाची वही

एकदाचा ससेमिरा
निबंधांचा संपला की
केल्या दुरुस्त्या सगळ्या....
काही राहिले ना बाकी

सुधारणा केल्या परी
चुका त्यातही मिळाल्या
( धन्य गुरुजींची ! त्यांना
वाचण्याचा ना कंटाळा ! )

दोन निबंध चोरले
सुहासच्या वहीतून
एक कळला वाटते !
म्हणून ही मोठी खूण !

पावसाळा....ग्रंथालये....
उषःकाल....भेळवाला....
ग्रामोद्योग....एस्टी स्टँड....
नाना विषयांशी चाळा

करा कल्पना जराशा,
सूक्ष्म हवे निरीक्षण,
नीटनेटकी मांडणी,
शुद्ध असावे लेखन.

सारे सांभाळून वह्या
लिहा एका दिवसात
अशा वेळी वाटे—व्हावे
पक्षी, उडावे नभात !

ठायी ठायी लाल रेघा,
लाल खुणा, लाल शेरे
याच्यापुढे लिहीन मी
लाल शाईनेच सारे !

एका पानावर खूप
टिंबे मांडून ठेवीन
'हवी तेवढी घ्यावीत'
अशी विनंती जोडीन.

# आमिष

म्हणतात पूर्विची शाळा ना राहिली
पुस्तकी-परीक्षा हद्दपार जाहली
खेळता खेळता ज्ञान अता घ्यायचे
अन् शिकता शिकता आम्ही खेळायचे
ते ज्ञान मिळवता वाटावी गंमत
भय-कंटाळा ही जावी चित्तातुन
यासाठी करिती शिक्षक युक्त्या किती
(ऐकून आमुची कुंठित होते मती !)
'हे अमके वाचा....तमके आधी लिहा
ह्या वस्तू जमवा.... शोधुन इतुके पहा....'
संदर्भ ग्रंथ ते लठ्ठ कुणी चाळती
ती खिशात कात्री.... चित्रे धुंडाळती
कुणि फूलपाखरे-कीटकही मारती
कुणि शंख-शिंपले शोधाया भटकती
मातीची चित्रे....तक्ते... आराखडे
ही किती हमाली ! येते आहे रडे !

अभ्यास करावा म्हणुन टाकती गळ
आमिषापासुनी न ये काढता पळ !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १५५७१
ग्रंथ शाखा (कथक प्रत)



# माझ्यासाठी

ह्या खिशात माझ्या साठवलेले खडे
त्यांच्यास्तव धरती चिंचांना आकडे

हा गलोल केला कष्ट घेऊनी किती
त्याच्यास्तव पक्षी झाडावर थांबती

पुस्तकी असाव्या खुणा म्हणूनी इथे
या घायपातिचे रोप तिथे वाढते

माझिया पतंगा नको अडथळा मुळी
नभ उदार बनले खोल निळी पोकळी

कागदी नाव मी जेव्हा हाती धरी
अंगणी तेधवा धावुन येती सरी

मी पकडू जाता उडती फुलपाखरे
अडकवण्या त्यांना फुलू लागती फुले

—भटकणे, खेळणे, गाणे थांबावया
जन्मल्या परीक्षा....दुःख अम्हा द्यावया !

## चित्रकार

मेजावर मांडतात वस्तू ह्या जीवहीन
चित्र रेखणे त्यांचे ....सक्ती मज आवडे न

रंगाकृति करण्याला रंग अम्हा निवडू द्या
उघडपणे गुरुजींचे चित्र अम्हा काढू द्या

धर अशीच पेन्सिल हो....रंग हाच लाव इथे
तुमच्यासम चित्र आम्ही काढावे हे न बरे

मनि माझ्या नवनवीन कल्पनांस ये भरती
रंगांनी....रेषांनी....पकडू बघे....पण पळती

स्वस्थ एकटा मजला राहू द्या पाहू द्या—
सायंतानि पश्चिमेस ये भरती रंगांना....

रम्य छटा पुष्पांना, रम्य रूप मेघांना
नित्य नवी गति लाभे पक्ष्यांना, लाटांना

पेन्सिलीस भटकू द्या स्वप्नातील वाटांनी
कुंचल्यास आणू द्या पुष्पे तिथली खुडुनी

## शाळेचा वार्ताफलक

झाले काय जगात काल परवा, ते वाच येथे मुला
खाल्ला मार! क्रिकेट खेळ अपुला नाहीच रे राहिला!
ह्या येथे क्षण थांबुनी बघ गड्या ही अक्षरे साजिरी
ते माथ्यावरचे सुभाषित, नको अर्था विचारू परी...

कोठे पूर महा... कुठे न पडला पाऊस वर्षामधे...
कोठे संप, कुठे महोत्सव सुरू, कोणी कुठे जीव दे....
शास्त्राची प्रगती... प्रचंड असती राष्ट्रापुढे योजना!
देती भाषण मंत्रि (फक्त).... निघती उद्घाटना... भोजना....

कोठे ते खलिते... निदर्शन कुठे.... सर्वत्र आश्वासने....
कोठे आक्रमणे, नभात भ्रमणे, वा सागरी हिंडणे...
आणा विश्वच सर्व मंथुन तुम्ही ताज्या–नव्या त्या कथा
मित्रांनो, परि एक थोर घटना खाली लिहावी अता!

...माझी पेन्सिल रे नवीन परवा रस्त्यावरी सांडली
कोणीही परि ती अजून मजला आणूनिया ना दिली!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# व्याख्यान

चिखल जमावा....सतत पडाव्या रिपरिप जलधारा
तसा मुलांवर व्याख्यात्यांच्या शब्दांचा मारा....
भीत-पाखरे तशी मुले ही सभागृही बसली
झोप–जांभया आवरूनिया बाकांना खिळली...

उपदेशांचे वरचेवर ते पाजतात डोस
रुग्णच सगळे ! हास्य न लाभे मुळी औषधास
चिता पेटते प्रदीर्घ मोठ्या शब्दांची पुढती
स्मशानातल्या उदास मुद्रा दिसताती भवतीं....

वृक्षारोपण-दिवशी रोपे लाविति बागेत
सक्तीने ही मुले आणिली खेचुनिया येथ
शब्दांच्या–उपदेशाच्या ह्या थांबत ना गारा
कैद्यांसम हे जीवन वाटे ! देवा तुम्ही तारा !

—कान मिटावे, यावी उघड्या डोळ्यांना झोप
अशी योजना करा काहितरी, नकोच हा ताप !

## शेवटचा पेपर

गजराला अजुनी पाचच मिनिटें उरली
निम्मेहुन अधिकच गणिते मी सोडविली
यश निश्चित आहे-अता न कसली धास्ती
तो कोपऱ्यातला काय पाहतो वरती ?
ही खुळी पोरगी मान मोडुनी लिहिते
त्या तिथे शहाणी काहीसे पुटपुटते

कुणि नखे खातसे....पेन चघळतो कोणी
फुटणारे मस्तक धरतो दो हातांनी
श्रम वर्षभराचे संपत आता आले
कुणि पाने परतुन वाची लेखन अपुले
हा थंड निरीक्षक उगाच फिरतो आहे !
झाडीतून वारा मजेत शिरतो आहे !

मी स्वस्थ बसूनी वाट बघे गजराची—
दोस्तांस घेऊनी निरुद्देश फिरण्याची
अभ्यास टाकला काढुन डोक्यातून
पुस्तके सर्व ती विकूनिया टाकीन

खोलीत मोकळे वारे....गप्पा....खेळ....
फिरणे अन् खाणे यात जाऊ दे वेळ !

गैरहजर

## शाळेचा प्यून

आवडे तेव्हा, आठवे अजून, शाळेचा प्यून
प्रसन्न कष्टाळू– असू दे पाऊस; असू दे ऊन
केला न उशीर, गेला ना लौकर
ठाऊक नव्हता कधीच आजार
वाटायचे कधी चाव्यांचा जुडगा यावा विसरून
–एकदा दिली अर्धा तास घंटा लौकर चुकून
आवडला तेव्हा, आठवे अजून, शाळेचा प्यून
त्याच्या जिवावर कळ्या होती फुले
सुट्टीत देखील स्वच्छ कोरे फळे
भिंतीवरती दिसली नाही चित्रकला–खूण
धास्ती उरात–कळेल त्याला कसेही कुठून
आवडे तेव्हा, आठवे अजून, शाळेचा प्यून
विद्यार्थी कोणी येताच नवीन
बुजून भिऊन जाई गोंधळून
याने बसवावे हात धरून धीर देऊन
होता दुखापत– ओरडा कितीहि– ओती आयोडीन....
आवडे तेव्हा, आठवे अजून, शाळेचा प्यून
संमेलन, सुट्टी, मासिके, सहल
त्याच्यासाठी कधी नव्हते स्टूल
–तीनही भाषांत केले त्याच्यावर निबंध-लेखन
स्तुति केली खूप (जमेल तेवढे शुद्ध लिहून)
आवडे तेव्हा, आठवे अजून शाळेचा प्यून
निवृत्त होईल; झोपेत उठेल–
ऐकून थोरल्या सरांची बेल
उदास एकाकी– असेल आभाळी डोळे लावून
खंत उरी माझ्या– 'आलो नाही त्याला प्रणाम करून'
आवडे तेव्हा–आठवे अजून–शाळेचा प्यून

## निरोपाचा दिवस

शाळेचा घेऊ सगळे आज निरोप
—वरकरणी रडणे....मनात सौख्य अमाप !
' किति प्रेमळ होते गुरुजन सारे अपुले !'
स्तुतिगीते गाता गळे भरूनी आले
—विसरेन कसा मी गतवर्षींचा चोप ?
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप
' किति सुरेख सुंदर शिकवीले सर्वांनी
केल्यात मोकळ्या ज्ञानधनांच्या खाणी '
—व्हायची तेधवा मला अनावर झोप
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप !
' रे, क्षणात गेली इथली वर्षे चार
जे स्कॉलर त्यांना....आम्ही पण बेजार
—हालु द्या एकदा हा इथला मुक्काम
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप
' हित तुमचे व्हाया कठोर झालो केव्हा '
वदतात गुरूजी. विसरू सारे आता—
—ती शिस्त, परीक्षा, वह्या, दंड, संताप !
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप....
' जग अफाट आहे आता तुमच्यापुढती
जे समर्थ असती तेच जीवनी टिकती '
—काढून लावणे नव्या ठिकाणी रोप !
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप....
' त्या तिथेच झाले भांडण अपुले पहिले
छे ! तुझे नव्हे रे—माझे होते चुकले '
दोस्तीचा कधिही नको व्हावया लोप !
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप....
शाळेचा घेऊ सगळे आज निरोप
सुखदु:खाचे ना कुणा मिळाले माप !

## बाकांचे गाणे

रे, कळले ? पडली उद्यापासुनी सुट्टी !
महिनाभर आता विश्रांती– विश्रांती !

वाहून मुलांचा आणि वह्यांचा भार
पुरतेच जाहलो होतो की बेजार
खेळेल कवडसा मजेत अंगावरती....
महिनाभर आता विश्रांती– विश्रांती !

कधि वर्गामध्ये सगळे कविता गाती
तबल्याचा ठेका मजेत कोणी धरती
दुखतसे पाठ ही ! चुकली ती आपत्ती....
महिनाभर आता विश्रांती– विश्रांती !

कोरली कुणाच्या चाकूने ही लेणी
ही बेपर्वाई ! कला म्हणा वा कोणी !
शाईच्या सरिता वाहत अंगावरती....
महिनाभर आता विश्रांती–विश्रांती !

वर्गात चालु द्या तुमचे तिकडे काही
कुणि घोरी-वंशज अखंड निद्रा घेई
ती कटकट कानी पुन्हा यायची नाही....
महिनाभर आता विश्रांती– विश्रांती !

ऐकता पुराणे बघत बसू आभाळा
जांभया यायच्या गणिताच्या तासाला
चेहरा करारी, उरी आमुच्या धास्ती.
महिनाभर आता विश्रांती– विश्रांती !

पण बंद व्हायची आता सगळी दारे
शिरणार कोठुनी कुजबुजणारे वारे ?
बसणार धूळ अन् कचरा अंगावरती !
महिनाभर आता नकोच ती विश्रांती !

करणारच नाही फळा अता संवाद
ती विसरा काव्ये....विसरा शास्त्र-विनोद....
त्या विसरा थापा.... विसरा दंगामस्ती...
कोळ्यांची जाळी दिसतिल अंगावरती

महिनाभर आता नकोच ती विश्रांती!
निर्जीव शांतता नको मुळी ही भवती
ते शब्द मृगाचे पडु द्या कौलावरती

संपून जाउ द्या मे महिन्याची सुट्टी
क्षणभरही आता नको नको विश्रांती!

## उद्या परवा—

असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास !
        भूगोलास्तव त्या त्या देशा
        जाउन ऐकू नवीन भाषा
चाखत द्राक्षे झेलत राहू हिवाळी पाऊस !
असली शाळा उद्या परवा येईलही जन्मास
        शतके शतके मागे जाऊ
        शिवरायाचे सैनिक होऊ
' हरहर ' गर्जत जाऊ करण्या अन्यायाचा नाश
असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास !
        साल, फॉर्म्युले, प्रमेय, व्याख्या
        पाठ कराया उपाय सोपा
गोळ्या रंगित गोड छानशा, मिळतिल प्रत्येकास
असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास
        शुद्धलेखनामधली चिन्हे
        नियम तयांचे कुणी न जाणे
वर्षाकाठी घेतिल देतिल कमजास्ती झाल्यास
असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास
        येता कंटाळा घंटा ही
        वाजत राहिल-देत जांभई
शाळा भरली ? शाळा सुटली ?— कळेल ना कोणास
असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास
        हरेक पुस्तक फूल गोजिरे
        शिकणारे अन् फूलपाखरे
ज्ञानाचा मध चाखायाला असेल सकला प्यास
असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास
        मधल्या सुट्टित नर्तन गायन
        खेळावाचुन दुजा न ' फाइन '
चुकून, चोरून करतिल सगळे फिरताना अभ्यास
असली शाळा उद्या परवा येइलही जन्मास !



# एक संवाद

बाळ्या, बाळ्या, दिवाळीच्या सुट्टीत
खाल्लास काय एखादा तरी नवीन पदार्थ ?
—चहा आणि चिवडा यांनाच असतो खरा अर्थ !
वाचलेस काय रे
एखादे तरी नवीन पुस्तक ?
—छे रे ! बाबा, परीक्षेसाठी वाचून वाचून
फुटले होते आधीच मस्तक !
दिवाळीच्या सुट्टीत
जोडलास काय एखादा तरी नवीन दोस्त !
—त्यानेच केला असता माझा खाऊ सगळा फस्त !
सुट्टीमध्ये पाहिलीस किती नवीन शहरे ?
—कशास बघावी ? एकासारखे असते दुसरे !
काढली असशील रंगीत चित्रे दहाबारा तरी !
—छे हो ! राहिली चित्रकलेची वहीच कोरी
खेळत होतास सकाळ संध्याकाळ खूपखूप खेळ ?
—सिनेमापुढे मिळाला नाही मुळीच वेळ !
व्यायाम करून केले असशील शरीर तगडे ?
—बारीक झालो म्हणून शिवले दोन डझन नवीन कपडे !

## नवे वर्ष-नवा वर्ग

सरे उन्हाळ्याची सुट्टी
आणि उजाडला जून
नवे वर्ष-नवा वर्ग,
वह्या-मैत्रिणी नवीन



छान आहे वर्ग गडे
माडीवर हवेशीर
बाग दिसते इथून
खिडकीशी बसणार !
जिन्यावरून धावत
येते आहे कोण बरे ?
शाळा सुरू होण्याआधी
सुरू जाहले नखरे !
तिथे कारंजाजवळी
दिसे नवीन पाहुणी
किती वेंधळी बावरी !
आली काय खेड्यातुनी ?
गडे प्रधान-बहिणी
झाल्या पुण्याला रवाना
सरकारी नोकरीचा
किती फायदा मुलींना !
केतकीच्या अत्तराचा
नाही यायचा ग वास
तिच्यासाठी वडिलांनी
स्थळ हेरले धुळ्यास.
चष्मेवाल्या बाई का ग
अशा चालतात खिन्न ?
(गडे, जमून मोडले
याही वर्षी त्यांचे लग्न)
–सायलीची वेल कशी
वाळली ग अवचित ?
कळले का ? बेबी गेली
परवाच आजारात....

# इतिहासाचा तास

इतिहास चालला शेवटचा हा त्रास
होउ द्या कसाही साम्राज्याचा ऱ्हास
पडतसे संस्कृतीवरती खूप प्रकाश
रे ध्येय आमुचे काठावरती पास...

चिकटविते दाढी राणी नूरजहान
गंधाचा पट्टा ओढी चेंगिझखान
' तुज आवडले का मोराचे हे पीस ? '
' मज कुठे मिळाले ? तो मोठा इतिहास ! '

बघ चष्मा वळला आपुल्याच रेखाने
उलटूच नको मुळि तशीच असु दे पाने.
त्या तिथे खेळती ' फुल्या मांडुनी ' कोणी
' समजले–समजले ' गणती करती कोणी

सरकला कवडसा मोठ्या चित्रावरती
पिशवीत पुस्तके घाला हलक्या हाती !



# मधली सुट्टी

घणघणली घंटा....
मधली सुट्टी
टोप्या घालुन पेने बसली....
पंख मिटूनी पुस्तकपक्षी घरट्यांमध्ये क्षणात शिरले !
बाईंचेही पुराण सरले घालुन आठी....
मधली सुट्टी !
सटसटली सर अन् चपलांची जिन्यावरूनी
दारे झाली कासाविस ती !
फुलती खुलती इंद्रधनुष्ये कुजबुजणारी
किलबिलणारी !
खोड्या काढत पळते आहे उनाड पट्टी....
मधली सुट्टी !
आता नळाला सुचते आहे पाठांतर ते कान पकडता
व्हरांड्यातुनी-बागेमधुनी फिरू लागती नवे ताटवे !
लखलखणारे डबे सांगती 'काढा झाकण
विसरा भांडण !'
शिरा देऊनी भाजी घ्यावी....जमवा गट्टी....
मधली सुट्टी !
वामकुक्षितुन आंबा झाला अवचित जागा
कुणि दगडाचे प्रश्न टाकता !
शब्द मुखात काही येती--कैऱ्या बनती
किती हालवा--वदे न मुळिही
बोर उभी ही खट्टीमिट्टी....
मधली सुट्टी !
शुः ! हवी शांतता....हे ग्रंथालय....ग्रंथ झोपले
चित्र पाहत उगाच भटका
चाळुन मासिक वाचा चुटका ( हसू नका पण )
डेस्कावरती डोके टेकुन कोण झोपली ?

उठवा तिजला....असेल चोरून चघळत पट्टी....
मधली सुट्टी !
सायलेन्स !
तिथे चाळिशी लावुन बसली
स्कॉलर कोणी — आजीबाई !
इथेच करते ' होमवर्क ' ते
ठाउक नाही हसणे, फिरणे, खाणे,....अथवा सुट्टी !
अभ्यासाचा ध्यास सारखा.... पोरच हट्टी !
मधली सुट्टी !
वाजे घंटा.... सुट्टी सरली....
हिच्यावाचुनी सगळ्या कष्टी
सरली, नीली, माली, शाली, लीली
लौकर सरली नाही का ग सुट्टी मधली ?
ली ली ली ली लीऽ

# सांस्कृतिक कार्यक्रम

येथे रंगत वाद ' श्रेष्ठ असते तलवार की लेखणी ? '
जांदूचे करती प्रयोग इकडे वस्तू बहू मांडुनी....
गाण्याच्या मधुर स्वरात तिकडे तो वर्ग सारा रमे....
तेथे नाटक ऐतिहासिक सुरू शाळेत साऱ्या घुमे....

मैदानावरती जमून कचरा टाकून देती कुणी....
वर्गाला सजवावयास श्रमती चित्रे, फुले आणुनी
हे घ्या पाहुन लोकनृत्य अगदी ठेक्यावरी वाकती
फिल्मी गीतच बुल्बुलावर कुणी छेडावया पाहती

सारा वर्ग तिथे खिळून बसला ऐकूनिया बासरी....
ह्या वर्गात कलाप्रदर्शन....तिथे गोष्टी कुणी सांगती
विद्यार्थी करतात काम सगळे....बाकावरी शिक्षक....
देते सुप्त गुणांस वाव अमुच्या, शाळा किती मोहक !

ह्या वेळीहि उदास काहि दिसती....काही घरी धावती
त्यांची धन्यच ! अमृतास त्यजुनी वेडे चहा वांच्छिती



## हे असेच व्हावे

हे असेच व्हावे वाटे कितिदा तरी
ती परी दिसाया हवी एकदा तरी !

हे जिवंत व्हावे सुस्त थंड टेबल
पाठीवर बसता एक छडीचा वळ
रडवेले होइल करील अन् वळवळ....

हा कोपऱ्यातला जिवंत व्हावा फळा
लिहिताच खडूने होतिल की गुदगुल्या
तिन पायांनी का येईल धावायला ?....

जावेच पळूनी भिंतींनी येथुन
हे छप्पर व्हावे निळासावळा ढग
मग गंमत सगळी....खुले मोकळे जग!....

बाकांच्या व्हाव्या झणि वाटा तांबड्या
डेस्कांच्या व्हाव्या हिरवळल्या टेकड्या
तो डस्टर जावा टुणटुण मारत उड्या

पुस्तके सर्व ही व्हावी फुलपाखरे
या दौतींमधुनी वाहत यावे झरे
मग होड्या बनुनी वाहतील दप्तरे....

ही खुर्ची व्हावी छान मांजरी मनी
गुरुजींनी व्हावे लहान आमुच्याहुनी
खेळावे, गावे शाळेला विसरुनी

हे असेच व्हावे वाटे कितिदा तरी
मज दिसली नाही गोष्टीमधली परी !

## शेवटल्या बाकावर

शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी
डुलक्या घेता घेता येथुन बघतो दुनिया सारी
        विषय आपुले करण्या रंजक
        शिकस्त करिती सदैव शिक्षक
देत जांभया बेत करितो—'व्हावे काय फरारी!'
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी.
        कधि डेस्काचा तबला करतो
        कधि ब्लेडने नाव कोरतो
इथुन कागदी बाण, विमाने अवचित घेति भरारी
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी.
        मासिक चालू वहीत दडवुन
        'पिक्चर-स्टोरी' वाचू चोरून....
खून शोधण्या धनंजयासह रिघतो गुप्त भुयारी
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी.
        कुणी न करती अमुचे कौतुक
        'रिपीट' एकच हुकूम ठाऊक
प्रश्न बापुडे हिरमुसलेले वळताती माघारी
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी.
        तपासणीचा दिवस वगळता
        होतो मारा उपदेशाचा
दंगा-धोपा करो कुणीहि—संशय अमुच्यावरती
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी.
        हसोत स्कॉलर-अम्हा न पर्वा
        अटळच आहे शेवट सर्वा
प्रगती अमुची निश्चित, कारण नित्य बघू सामोरी
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी
शेवटल्या बाकावर अमुची अखंड मक्तेदारी.
डुलक्या घेता घेता....

## खडूची कांडी

शुभ्र खडूची कांडी मी तर !
ज्ञान द्यावया सदैव तत्पर !
मी हिमगौरी
सफेत गोरी
शंभर आणिक चव्वेचाळिस भगिनी
आलो पेटीमधुनी
रुळतो आम्ही
शिक्षक–हाती....मेजावरती खणात अथवा !
काळ्या काळ्या फलकावरती शब्द विजेचे
उठवुन करतो
ज्ञानपंथ तो नित्य प्रकाशित.... शिकणाऱ्यांना....
विसरुन जाती शिक्षक आम्हा वर्गामध्ये....
अमुच्यासाठी किती भांडणे.... किती लढाया !
रेषा....बिंदू....अंक....आकृत्या....शब्द....अक्षरे !
झिजतो आम्ही क्षणाक्षणाला
दुपारच्या सुट्टीत जराशा करतो गप्पा....
राख आमुची फलकापाशी....
ज्ञानासाठी दिव्य आहुती !
भूमीमधुनी आलो आम्ही
पुन्हा भूमिमधी गुप्त व्हायचे...
गुरुजींचा तो लहान बालक येतो आहे
इकडे रांगत—
खाऊ समजुन मलाच तोंडामध्ये टाकिल !

## हस्तलिखिताची तयारी

कल्पना निघाली– ' हस्तलिखित काढु या '
मग सजले सारे निज नावे छापण्या !
कुणि गोष्टी दिधल्या– कविता दिधल्या कुणी
( मज माहित आहे– खूप खूप चोरूनी ! )
झळकतील नावे पानां-पानांवरी
( स्तुति परस्परांची करण्या संधी बरी ! )
कवि बनतिल कोणी....कोणी संग्राहक
( मी खरे सांगते– मी अपुली वाचक ! )
नच अनुक्रमणिका वदेल माझे नांव !
मी किमपि न लिहिले-- तो नच माझा गाव !
ना सुचे काहिही– धैर्य न चोरावया
ब्रश हाती घेते– फक्त दात घासण्या !
हस्ताक्षर माझे– मला न ये वाचता
मी व्यवस्थापिका ? कां भलते बोलता !
– पेन्सिली घेउनी आखिन ओळी चार
मग पुसून टाका– मानु नका ' आभार ! '

## वार्षिक तपासणी

येतील आजला बाईंच्या सासवा
पोषाख आजतरि नीटनेटका हवा

‘ हे कपटे उचला....काढा कोळिष्टके
ते कुंपण घाला....डेस्क नको मोडके
मैदान चुन्याच्या रेषांनी रंगवा....’
येतील आजला बाईंच्या सासवा.

‘ सर्वांची झाली निबंधसंख्या पुरी ?’
‘ येईल म्हणाया कविता थोडी तरी ? ’
‘ घाबरू नका जरि प्रश्न टाकला नवा !....’
येतील आजला बाईंच्या सासवा.

‘ उपकरणे पुसुनी छान मांडणी करा
बाटल्यांमधूनी पाणी थोडे भरा
लेबले अल्कली-आम्लाची चिकटवा....’
येतील आजला बाईंच्या सासवा.

हे सजले योद्धे घेउनिया शस्त्रास्त्रे....
कंपास, नकाशे, खडू, वह्या, पुस्तके
स्थिर आज न त्यांच्या काळजात ताजवा....
येतील आजला बाईंच्या सासवा.

दिसणारच नाही आज कुठेही छडी
नसणारच सेना बाकावरती खडी
म्हणणार कुणी ना-‘ रे गद्धया, गाढवा ’
येतील आजला बाईंच्या सासवा.

मी खूप दिसांनी आलो बघण्या मजा
ही तपासणी तर गुरुवर्यांना सजा
विनवितात डोळे—‘ बाळांनो वाचवा ’
येतील आजला बाईंच्या सासवा.

ना तपासलेली मुळीच माझी वही
गठ्ठ्यात तरीही चोरुनिया सारली
पाहिली तीच तर होइल माझा खवा
येतील आजला बाईच्या सासवा.

येतात पहा त्या बाईच्या सासवा
ये हवेत कोठुन अवचित गारवा ?
वर्गात शांत का असा मुलांचा थवा ?
आल्याच– पहा ह्या दाराशी सासवा...

# कवाईत

‘ सामूनिगा ’ एकसाथ
करा पुढे, खाली हात
करायची कवाईत
शाळेपुढे मैदानात.
सावरतो टोपी कोणी
बूट रुतती पायांस
खिशातील खडू, बोरे
वाकताना सांडतात.
लठ्ठ लखूला, निळूला
नाही वाकताच येत
सारे बसता खालती
वर उठे एकनाथ.
जागा सोडतात कोणी
जाती दुसऱ्या रांगांत
बाळ्या वाजवतो टाळ्या
सारे पसरीता हात.
‘ जरा पहा ना वरती–
चिंचा कशा झुलतात ’
( भिरकावून दगड
देऊ हळूच जोरात ? )
ढोल जुनाट कधीचा
नाही फुटत हा कसा ?
नाही अजून बसला
नव्या मास्तरांचा घसा !

पाखरांचे भिरे फिरे
हवे तसे वाऱ्यावर
आज मात्र गाठणार
सगळयांच्या आधी घर !



## सहलीस जायचे—

सहलीस जायचे सर्वांनी आपण
——म्हणतात मिळतसे तेथेही शिक्षण !
कुणि करतिल कपडे इस्त्रीचे झकपक
——वाटेल असावी तपासणी वार्षिक !
आकंठ भरूनी येतिल सगळे डबे
——नवनवे मनसुबे मनात अमुच्या उभे !
घुमवूया राने करुन मोकळे गळे
——मग हळूच काढू गलोल पिशवीतले !
आम्हीच बनूया नौका पाण्यावरी
——भिजवुया बाईंना चिडवू थोड्या तरी !
तरुतळी घेउया वाटुनिया जेवणे
——त्या वेळी करुया थोडीशी भांडणे !
घालुया उखाणे, कोडी त्यानंतर
——बाईंना मुळिही सुचू नये उत्तर !
संपूच नये हा दिवस कधी लौकरी
——बाईंनी यावे शिस्त विसरुनी घरी !

म. ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५६७
ग्रं. : शाखा स्थान
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ५३.६.२५... वि: ...
...२८३८... नोंद दि: २।५।६७

## गणवेष

शुभ्र शर्ट, पँट खाकी
( किंवा असेच दुसरे )
असा हवा गणवेष....
शाळेमध्ये एक सारे

टोपी पांढरी तिरकी
हवी डोक्यावर तशी
हवी उजव्या खिशाला
पट्टी निळी सुरेखशी

सामूहिक कवाईत
किती खुलून दिसेल
खाकी पट्टे– शुभ्र पट्टे
खालीवर हालतील

गावामध्ये कुठेहि जा....
माझ्या शाळेचा पोषाख
सांगणार नित्य आम्हा
' नावलौकिकाला राख '

' निळा शर्ट-हिरवा शर्ट '
असे बोलणे थांबेल
सहलीस गुरुजींची
त्रेधा खूपच उडेल

परी शाईचे ठिपके,
मैदानींची लाल माती
यांना खेळवणे भाग
आम्हां कपडयांवरती

कधी वाटते, नसावा
शाळेमध्ये एक वेष
जगामध्ये बघा किती
नाना लोक.... नाना देश !

परीक्षेतील उत्तरे
काही घ्यावी छापुनिया
नाना रंग नाना रेषा,
नाना आकृत्या काढाव्या

इंद्रधनुष्ये फुलावी
फुलबाग नाना रंगी
विदुषकाचा पोषाख
वाटे चढवावा अंगी !

# पारितोषिक-वितरण समारंभ

अहवाल वाचणे संपत आले आता
( किति वेळ घेतला....खूप मारल्या बाता )
पत्रके, पाकिटे, पदके, प्याले येती
चमचमती मेजावरती—डोळे दिपती
हसतील काहि अन् काही ते रुसतील
त्या पंचांवरती रोष-तोष होईल !
रे सावध, ऐका नांवे जयवंतांची....
रे, करा तयारी....टाळ्यांची....शिट्ट्यांची....
बक्षीस मिळाले पोपटास का पहिले ?
लेखनामधे का प्रथम ध्यान हे आले ?
देवाने दिधला गळा गोड बेव्यास—
जाईल बुडुनी पदकांच्या राशीत
नटसम्राटच हा....बक्षिस आहे रास्त
वा ! चित्रकलेमधि पहिला अमुचा दोस्त
—ऐटीत येति अन् अभिमानाने लवती
लाजती कुणी पण प्रसन्न सारे दिसती
किति दिमाख त्यांचा....उत्साहाला भरती
ना उरी मुळीही ' नापाशीची ' धास्ती !

ती पदके, प्याले, प्रशस्तिपत्रक अथवा
लाभले मला नच, तरी न मजला हेवा
उत्तेजन द्याया हवेत प्रेक्षक काही !
( अन् त्यांच्यासाठी हवीत पदके काही )






ज्यांना कविता वाचणे, ऐकणे आवडते त्यांना वाटते, आपल्यालाहि कविता रचता येईल काय ? एखादी कल्पना सुचते पण ती कागदावर उतरत नाही. मग ते कंटाळून म्हणतात— आपल्याला स्फूर्ति कुठे आहे ? ज्यांना गुणगुणताना आपणहि लिहावेसे वाटते त्यांना प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी काही मदत व्हावी यासाठीं हा लेख आहे.

'कवि जन्माला येतात, ते तयार करता येत नाहीत' अशा अर्थाची इंग्रजी म्हण आहे, पण ती संपूर्ण सत्य नव्हे. स्फूर्तीचा भाग कवितेमागे असतो, पण केवळ स्फूर्तीनेच चालत नाही. स्फूर्ति ईश्वरदत्त देणगी असली तरी पद्धतशीर परिश्रम केल्याखेरीज कवितालेखन होणार नाही. स्फूर्ति होईल तेव्हा होवो, तोपर्यंत तांत्रिक भाग शिकून ठेवायला काय हरकत आहे ? त्यामुळे कविता लिहिता आली नाही तरी कविता समजून घ्यायला तरी मदत होईल !

कवितेत आणि गद्यलेखनात महत्त्वाचा फरक कोणता ? कवितेतील वाक्ये रोजच्याप्रमाणे नसतात. त्यातील शब्दक्रम वेगळा असतो. कधी वाक्य अपूर्णहि असते. एक वाक्य अनेक ओळीत किंवा अनेक वाक्ये एका ओळीत असतात. डोळ्यांना त्यांची रचना बहुधा बंदिस्त वाटते. मुक्तछंदातील रचना देखील गद्य परिच्छेदाहून वेगळी वाटते.

हा वरवर बघता आढळून येणारा परिणाम आहे. पण दोघात फरक असतो तालाचा. एक गद्य उतारा वाचा. त्यात ताल असेलच असे नाही. कवितेत नकळत ताल आलेला दिसेल, कानांना जाणवेल. ताल म्हणजे नकी काय ? ते सांगणे कठीण. समुद्राच्या लाटा तालावर किनाऱ्यावर पसरतात, नाडीचे ठोके तालावर पडतात, नृत्याला

ताल असतो. तसाच काहीसा ताल कवितेला असतो. शब्द वाचू लागल्यानंतर ठराविक वेळ घेणाऱ्या शब्दांचा वा अक्षरांचा गट पडतो. असे गट एकामागून एक येतात आणि एक लय साधली जाते. कवितेत ही लय महत्त्वाची. त्याशिवाय अंतर्गत लय असते. अंतर्गत लय म्हणजे कवितेत असलेल्या भावनेला मिळणारे आंदोलन. ते सहज मिळत राहिले पाहिजे. काही वेळा कमीजास्त शब्द झाल्यास ताल बिघडतो, खटकल्यासारखे वाटते. कविता गुणगुणत राहिल्याने ही तालबद्धता कळू लागते.

ही लय साधण्यासाठी काय करता येईल ? काहीजणांना वृत्ताचा सराव नसताही ते गीते कशी रचतात ? चांगलीं गीते गुणगुणून त्यांचे ओठ नि कान तयार झालेले असतात. लय केवळ डोळ्यांना कळत नाही. त्यासाठी कविता गुणगुणणे आवश्यक आहे. म्हणजे कविता आधी लिहू नये. स्वतःशीच म्हणून पाहावी.

ही लय साधण्यासाठी रचना कशी करता येईल ? स्वरांवर हुकमत मिळवता आली की शब्दरचनेवर हुकमत मिळवता येईल.

अ, इ, उ हे ऱ्हस्व स्वर आहेत आणि आ, ई, ऊ, ए, ऐ हे दीर्घ स्वर आहेत. ऱ्हस्व स्वरांच्या उच्चारणाला जितका कालावधी लागतो त्याहून अधिक काळ दीर्घ स्वरांना लागतो. ऱ्हस्व स्वरांना लघु ◡ ही खूण देतात, आणि दीर्घ स्वरांना गुरु — ही खूण देतात. प्रत्येक अक्षर घेतले तर त्यांत लघु वा गुरूची मात्रा असणारच.

क हें अक्षर आहे. त्यांत क् हें व्यंजन आहे आणि अ हा स्वर त्यात मिसळला आहे. म्हणजे क् + अ = क. म्हणजे ‘ क ’ मध्ये अ हा ऱ्हस्व स्वर मिसळला. म्हणजे त्याची मात्रा लघु होय.

‘ का ’ मध्ये (क् + आ ) आ हा दीर्घ स्वर आहे. आ हा दीर्घ स्वर म्हणून ‘का’ ची मात्रा गुरु होय. यावरून दिसेल की प्रत्येक अक्षरांत लघु किंवा गुरु असणारच.

‘ सकल ’मध्ये तीन लघु ( ◡ ◡ ◡ ); ‘ सकाळ ’मध्ये लघु गुरु लघु ( ◡—◡ ); ‘ पळाला ’मध्ये लघु गुरु गुरु ( ◡— — ).

उच्चारावरून लघु वा गुरु ठरवायचे हें तत्त्व मान्य केल्यानंतर जोडाक्षरे पाहा.

‘ यत्न ’ इथे य हा लघु वाटतो. पण आपण य नुसता म्हणत नाही, त्याच्याबरोबर त् हे व्यंजन घेतो. म्हणजे यत् या उच्चाराला य पेक्षा अधिक वेळ लागतो; य वर जोर येतो याचाच अर्थ ‘ यत्न ’मधील य ची मात्रा गुरु आहे. ‘ न ’ ची मात्रा लघु आहे.

तसेच पुढील शब्द पाहा. ज्यावर जोर येईल ते अक्षर गुरु.

संत (—◡); अक्षर (—◡ ◡); सर्वत्र (— —◡).

सन् + त; अक् + ष + र; सर् + वत् + र.

आता पुढील दोन ठळक शब्द पाहा.

१) मी **पुण्याचा** रहिवासी आहें.

२) पाप-**पुण्याचा** विचार कर.

पहिल्या वाक्यातील ‘ पु ’ आणि दुसऱ्या वाक्यातील ‘ पु ’ यांचा विचार करा

कोणावर जोर आहे ?

पहिल्या ' पुण्याचा 'मध्ये ⏑ — — मात्रा असतील.

दुसऱ्या ' पुण्याचा 'मध्ये — — — मात्रा असतील. कारण येथे ' पुण् ण्या चा ' असा उच्चार होऊन पु बरोबर ण् हें व्यंजन येतें आणि जोर पडतो, वेळ लागतो म्हणून त्या अक्षराची मात्रा गुरु होय.

पुढील ओळीतील शेवटच्या ' क ' या अक्षराची मात्रा लघु का गुरु ते ठरवा.

' विद्यार्थी करतात काम सगळें बाकावरी शिक्षक '

तें लघु नाही, गुरु आहे. कारण ? कारण ' क ' शेवटी आल्याने आपण त्यावर जोर देतो. त्याला जास्त वेळ देतों. त्याच ओळीतील ' करतात 'मधील ' क ' शेवटच्या व ' शिक्षक ' मधील ' क ' यांचे उच्चार लक्षांत घ्या; पहिला लघु, दुसरा गुरु.

अशा लघुगुरूंचा क्रम निरनिराळ्या प्रकारे ठेवून रचना विविध प्रकारच्या करता येतात.

सदा सर्वदा योग तूझा घडावा

⏑ — — ⏑ — — ⏑ — — ⏑ — —

तुझे कारणी देह माझा पडावा

⏑ — — ⏑ — — ⏑ — — ⏑ — —

सर्व ओळीत हाच क्रम ठेवला जातो. अक्षरांची संख्या सारखी; लघुगुरूचा क्रम सारखा. अशा रचनेला **वृत्त** म्हणतात.

आणखी उदाहरणे बघा :

झाले काय जगात काल परवा ते वाच येथे मुला

— — — ⏑ ⏑ — ⏑ — ⏑ ⏑ ⏑ — — — ⏑ — — ⏑ —

इथे एकोणीस अक्षरे. लघुगुरूचा क्रम कायम ठेवून पुढच्या ओळी रचलेल्या. इथे आणखी एक गोष्ट लक्षात ठेवायची. बारा अक्षरांनंतर थांबून दुसरा सात अक्षरांचा गट म्हणायचा. मध्ये थांबणे म्हणजे यति.

प्रत्येक वृत्तात यतीची जागा वेगवेगळी असेल. तिथे शब्द तोडला जाऊ नये याची काळजी घ्यायला हवी.

' माझी पेन्सिल सांडलीच बघ को । ठे काल रस्त्यामधे '

या ठिकाणीं को आणि ठे यांची ताटातूट कानाला खटकते. तसे होऊ नये. ही ओळ अशी घ्यावी:

' माझी पेन्सिल रे नवीन परवा । रस्त्यामधे सांडली '

पुन्हापुन्हा लघुगुरु विशिष्ट क्रमाने येतात ( ते येतील ही अपेक्षा असते ), त्यामुळे रचनेत ताल साधतो. एखादा लघुगुरु कमी झाल्यावर खटकते. पुढच्या ओळीत कुठे खटकते ?

' कोठे संप कुठे महोत्सव सुरू कोणी कुठे जीव दे
कोठे महापूर कुठे न पडला पाऊस वर्षामधे. '

दुसरी ओळ अशी हवी–'कोठे पूर महा......' कारण ओळींत क्रमाने तीन गुरु, मग लघु, लघु, गुरु असा क्रम आहे.

ह्या लघुगुरूचा उपयोग करून दुसऱ्या प्रकारची रचना करतात तिला **जातिरचना** म्हणतात. या ठिकाणी सर्व ओळीत सारखी अक्षरे नसतात, मग समान काय असते? मात्रांची संख्या. मात्रांची संख्या म्हणजे काय? लघूला एक मात्रा आणि गुरूला (जास्त वेळ—जवळजवळ दुप्पट वेळ—लागतो म्हणून) दोन मात्रा द्यायच्या. त्यांची बेरीज करायची.

'सकल' (᳘᳘᳘)मध्ये तीन मात्रा; 'सकाळ' (᳘—᳘)मध्ये चार मात्रा, 'प्रयत्न' (᳘—᳘)मध्ये चार मात्रा; अशा मात्रासंख्या मोजायच्या.

ह्या मात्रासंख्यांचे गट ठरवून रचना करायची.

सहा मात्रांचा एक गट जुळवीत गेल्यास एक सोपी धावती रचना होईल.

| मेजावर | मांडतात | वस्तू ह्या | जीवहीन |
|---|---|---|---|
| — — ᳘ ᳘ | — ᳘ — ᳘ | — — — | — ᳘ — ᳘ |
| २ २ १ १ | २ १ २ १ | २ २ २ | २ १ २ १ |

इथे प्रत्येक गटात लघुगुरु कितीहि असले तरी प्रत्येक गटातील मात्रांची संख्या सहाच भरणार. ह्या जातीला नाव आहे 'भृंग जाति'. हे सहा पायांच्या भुंग्याचे नाव आहे.

एका गटांत मात्रासंख्या आठ भरेल असे गट घेऊन रचना करता येते. ही सोपी आणि लोकप्रिय जाति. तिचे नांव पादाकुलक.

| | |
|---|---|
| शुभ्र खडूची | कांडी मी तर |
| — ᳘ ᳘ — — | — — — ᳘ ᳘ |
| ज्ञान द्यावया | सदैव तत्पर |
| — ᳘ — ᳘ — | ᳘ — ᳘ — ᳘ ᳘ |

इथें शेवटचे अक्षर ऱ्हस्व (र) असले तरी त्यावर जोर येत नसल्याने त्याची मात्रा लघु (᳘) धरली आहे, शेवटी एकच लघु असेल तर तो गुरु बनेल. उदा० सज्ज सदैव (–᳘᳘––).

मात्रासंख्येचे गट विविध करता येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| जरु | रीच असे का | कवितांची ह्या | आई |
| ᳘ ᳘ | –᳘ ᳘– – | ᳘᳘– – – | – – |
| लिहि | तसे कोण हे | कामच त्याला | नाही? |
| ᳘ ᳘ | ᳘ – – ᳘ – | –᳘᳘ – – | – – |
| २ | + ८ | + ८ | + ४ |

पहिल्या गटात एक गुरु चालेल. दुसऱ्या गटात चार गुरु किंवा आठ लघु चालतील. मात्रा संख्या मात्र आठ व्हायला हवी.

आता यातील पहिला गट उडवला तर नवीन रचना होईल.

उभा राहिला । भाषण तो कर । ण्याला
प्रारंभच पण । स्मरणामधुनी । गेला
८ + ८ + ४

किंवा २+८+८+४ यांतील उपांत्य अक्षर लघु मात्रेचे ठेवून नवीन रचना होईल.

ह्या | खिशांत माझ्या | साठवलेले | खडे
– | ◡ – ◡ – – | – ◡ ◡ – – | ◡ –
त्या | च्यास्तव घरती | चिंचांना आ | कडे
– | – – ◡ ◡ ◡ ◡ – | – – – – | ◡ –

ह्या रचनेला ‘ लीलारति ’ असे नाव आहे.

पुढील रचनेत तीन मात्रासंख्यांचे गट आहेत. किती किती मात्रा आहेत सांगा पाहू ?

उद्यां परवा | असली शाळा | येईलही जन्मास |
द्राक्षें चाखत | अंगावर झेलू | हिंवाळी पाऊस |

इथे आठ, आठ आणि बारा असे तीन गट आहेत. शेवटचे अक्षर गुरू मानायचे. कोणी बाराऐवजी दहाचाही गट करतात. आणि मग नवी रचना होईल ती अशी :

उद्या परवा | असली शाळा | जन्माला यावी. |

लघुगुरूचा विचार न करताहि दुसऱ्या रचना आहेत. इथे अक्षरांची संख्या विचारात घेतात. प्रत्यक अक्षर गुरु समजून जोर देत म्हणतात, हा **छंद** होय.

आवडे मला | आठवे अजून | शाळेचा प्यून |
किती कामसू | असू दे पाऊस | असू दे ऊन |

इथे लघुगुरूचा विचार नाही. इथे अक्षरांचे गट आहेत. पांच किंवा सहा अक्षरांचा गट घेऊन रचना केली आहे. पहिल्यात पांच वा दुसऱ्यात सहा असे बंधनहि नाही. प्रत्येक अक्षर जोर देऊन म्हणायचे. आता या एखाद्या गटात चार अक्षरे करा, एखाद्या गटात सात करा आणि गुणगुणून पाहा. खटकल्यासारखे होईल. म्हणजे ताल बिघडेल.

चार + पांच, चार + तीन असेहि गट कल्पून लिहू शकाल. त्यातहि स्वातंत्र्य घेता येईल. पण ते वाचताना खटकल्यासारखे वाटणार नाही एवढे पाहावे. त्या दृष्टीने ‘ एक संवाद ’ ही कविता पाहावी.

‘ बाळ्या बाळ्या, सुट्टीच्या दिवसात, खाल्लेस काय, नवीन पदार्थ ’

इथे चार सहा, पांच, पांच असे अक्षरगट आहेत. ही मुक्तछंदाची रचना म्हणायला, लिहायला सोपी.

प्रत्येक ओळीत आठआठ अक्षरें (लघुगुरूचा विचार न करता) लिहूनहि एक रचना होते. (उदाहरणार्थ : ‘ नवे वर्ष—नवा वर्ग ’)

‘ सरे उन्हाळ्याची सुट्टी आणि उजाडला जून
नवें वर्ष—नवा वर्ष…वह्या, मैत्रिणी नवीन ’

निरनिराळ्या रचनेतील आवडलेल्या कविता लक्षपूर्वक वाचाव्या, गुणगुणाव्यात. प्रत्येक ओळ निराळ्या तऱ्हेने त्याच रचनेत लिहिण्याचा सराव करावा म्हणजे रचनेवर ताबा येईल, ताल कळू लागेल. उदाहरणार्थ, 'पाठांतर' कवितेतील पहिली ओळ चाल कायम ठेवून किती तरी तऱ्हेने लिहिता येईल.

जरुरीच असे का कवितांची ह्या आई ?
का आवश्यकता कवितांची ह्या आहे ?
अडणार कधी का कवितावाचुन अपुले ?
बिघडेल काय जर कविता ह्या नसतील ?

तुम्हाला जेव्हा स्वतःची कविता करावी लागेल तेव्हा त्याची रचना कशी होईल हे ठरवा. दोनचार ओळीत अक्षरमात्रावृत्त, जाति वा छंद हा प्रकार समजेल. त्या रचनेत, त्या लयीत मग गुणगुणून पुरी करा.

स्फूर्ति येते म्हणजे काय होते ? कविता सुचणे हा प्रकार थोडाफार उपजत असेलही. तुमची आवड, तुमचे वाचन, तुमचे श्रवण यांचा वाटा त्या क्रियेमागे असतो. तुम्हीही अगोदरच्या कवितातून अनुभव घेता घेता काही सांगण्यासारखे मिळवीत असता. हे तुम्हाला नकळत चाललेले असते. एखाद्या वेळी मग ते स्पष्ट जाणवते.तुम्ही म्हणता— 'कविता होते आहे ! ' (गणित देखील केव्हा केव्हा असेच एकदम सुचत असते.)

त्यावेळीही सर्व कविता समोर नसते.एखादी सुरेख कल्पना,एखादा सुरेख शब्दसमूह, एखादा समर्पक शब्दही मग तुम्हाला भारनेने भारतो; धुंद करतो. मग त्याच्याभोवती योग्य कल्पना, शब्द तुम्ही जमवू लागता.

अशा वेळी विचारावे– ही कल्पना शिळी नाही ना ? खास हा माझाच अनुभव- आहे ना ? इतरास सांगण्यासारखा आहे ना ? हा कमीत कमी शब्दात मांडतो आहे ना ? फापटपसारा टाळता येईल ना ? ( ज्याला काय टाळावे हे कळते तो खरा कलावंत. ) कल्पनांची निवड हा महत्त्वाचा भाग आहे. एकाच कवितेत खूप गोष्टी कोंबण्याने परिणाम विस्कळीत होईल.

हे मनात तयार होऊ द्या. पूर्ण कविता तयार झाल्यास ठीक. अगदीच राहावत नसल्यास लिहून काढा. दोन ओळींच्या शेवटी, शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द हवेतच असे नाही. यमक साधलेच पाहिजे असे नाही. त्यामुळे पुष्कळदा आपण निरर्थक शब्दांमागे धावतो. यमकाचा विचार करूच नका. अतिशय अलंकारिक लिहिणे टाळा. मी खास माझा अनुभव मांडीन–अगदी सरळ प्रांजळ असा, असा निश्चय करा. जुन्याच कल्पना नकोत. ( हिरवा शालू, सूर्याचा रथ, गवतावरची रत्ने इ० इ०) '**तुम्हाला काय वाटले**' यातील प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे. झिजलेले शब्द टाळा.

एखाद्या दुःखाच्या, आनंदाच्या वेळी कविता सुचतेच असे नाही. त्यावेळी आपण आपल्यातच असतो. काही दिवसांनी दूर जातो, तटस्थ होतो. मग त्या अनुभवावर

तुम्हाला रचनेमुळे ताबा मिळू शकतो. लयबद्ध रचनेत तो अनुभव व्यक्त करू लागताच एक वेगळी तृप्ति मिळते.

शीघ्र कवि हे कवि असतील असे नाही. त्यांची शब्दांवर हुकमत असेल. ते पद्य करतील. त्यात काव्य असेलच असे नाही. संक्रांत, विवाह, सत्कार अशा प्रसंगी, वाटल्यास तुम्ही रचनेवर प्रभुत्व येण्यासाठी लिहा, पण ते काव्य समजू नका. उठल्या-सुटल्या वाटेल त्या विषयावर लेखणी चालवणे म्हणजे आपल्या शक्तीचा अपव्यय आहे.

प्रारंभी तरी वृत्त, जातीत रचना करा. मुक्तछंदाकडे वळू नका. पुढे पुढे मुक्तछंदाचा वापर करणे अटळ वाटेल तेव्हां लिहा. मग बंधने झुगारूनही अंतर्लय साधेल.

केशवसुतांपासून पाडगांवकरांपर्यंतच्या कवींच्या कविता वाचा. लोकांनी चांगली म्हटलेली कविता तुम्हासही चांगली वाटली पाहिजे असे मानू नका. छापलेल्या सर्वच कविता चांगल्या नसतात. एखादी कविता तुम्हाला बरी किंवा वाईट का वाटली याची कारणे मात्र शोधत चला. प्रारंभीं बराच काळ कवींच्या शब्दांचे, विषयांचे, शैलीचे तुम्ही अनुकरण कराल (अनुकरण म्हणजे मरण ही म्हण ठीक असली तरी). असे अनुकरण रचनेवर हुकमत येण्यासाठी आवश्यक असते. ही उमेदवारी, हा कित्ता गिरवणे अटळ असते.

हे साधले की तुम्हाला जाणवलेले सौंदर्य तुम्ही स्वतंत्रपणे व्यक्त करू लागाल—साध्या शब्दांत साधी भावना लयबध्द केलीत तरीहि त्यात काव्य असेल. मोठे शब्द नकोत; मोठ्या कल्पना नकोत! उगाज 'पोज' आण्याचा प्रयत्न नको. तत्त्वज्ञान, तात्पर्य, सारांश सांगण्याचा आव नको. ते कोणीही सांगेल.

कवितेला चार, सहा इत्यादि सम चरणच पाहिजेत, यमक पाहिजे ह्या कल्पना या काळात जुन्या झाल्या आहेत. यमक एकही नसेल, धृपद नसेल, अलंकार नसेल, साधेसुधे बोलणे असेल, बोलीतले शब्द, इंग्रजी शब्दही असतील, तरी बिघडत नाही. जे सांगाल त्यावर तुमचा ठसा हवा आणि त्याला एक लय आरंभापासून अखेरपर्यंत यायला हवी—नादाची आणि सुसंगत भावाची लय हवी.

कवितेला विषय लागत नाही— हृदय लागते. नेमून दिलेल्या विषयावर कविता करणे, एखादी ओळ देऊन कविता लिहिणे ( समस्यापूर्ती ) दुसऱ्या भाषातील कवितांचा अनुवाद करणे ह्या प्रकारानी लिहिण्याचा सराव होईल. मात्र तिथेच थांबू नका.

स्फूर्तीच्या झटक्यात लिहून काढली की झाली कविता, मग तिकडे बघायला नको; असे काही म्हणतात. पण त्यावर श्रम घेणे चांगले. डीलन थॉमसने 'फर्नहिल' नावाची कविता किती वेळा लिहिली असेल? जरा शब्द चुकीचा वाटला की नवीन कागद घ्यावा असे करीत त्याने ती दोनशे वेळा लिहिली!

कविता लिहिली की ती कायमचा शब्द. मग त्यात सुधारणा नाही असा आग्रह धरू नये. इतर कलांप्रमाणे त्यातही फेरफार, काटछाट संभवतात. नवा अचूक शब्द

सुचला, तो चपखल बसला तर पूर्वीचा कमी समर्थ शब्द उडवून लावावा.

कविता लिहा. बाजूस ठेवा. गुणगुणून पाहा. पुन्हा तटस्थ व्हा. निर्दय होऊन काटछाट करता येईल का ठरवा.

आपल्या ओळखीच्या मित्रास, टीकाकारास, शिक्षकास दाखवणे अधिक चांगले. त्याच्या शेऱ्यांनी नाउमेद होऊ नका. जवळची माणसे तुम्हाला विषय, भावना देणार नाहीत. रचनेत, शब्दात फार तर दुरुस्त्या सुचवतील. किंवा आवडली— आवडली नाही— ह्यावरूनही यशस्वी झाली की नाही— कळेल. आपण आपलीच कविता वाचताना खूपच गोष्टी गृहीत धरतो. निगडित दृश्ये, अनुभव, कल्पना इत्यादि आपणास ठाऊक असणार, त्या आपण (कवितेत नसल्या तरीहि) आपल्या कवितात अनुभवतो. इतरास त्या कुठून ठाऊक असणार? तेव्हा इतरांनी त्याबाबत सांगणे फायदेशीर ठरेल.

साध्याही विषयांत मोठा आशय आढळतो. कविप्रकृती ही नित्य असावी. कवि हा जगापासून वेगळा नाही— इतराप्रमाणेच त्याला भावना असतात. पण त्याच्या संवेदना अधिक जागृत असतात. त्या शब्दांत पकडण्याची धडपड त्याच्या नकळत चालू असते. आपल्याला जे वाटते ते रचनेत पकडून ठेवून अमर करणे यांतला आनंद तो अनुभवतो.

कविता उठल्यासुटल्या वाटेल त्याला ऐकवणे, वाटेल तिथे वाचणे ह्या गोष्टी टाळाव्या. अरसिकांपुढे वाचलीत तर ते नाउमेद करतात—मुद्दाम करतात असे नाही. निवडक लोकांस, त्यांनाहि कंटाळा न येईल एवढ्याच ऐकवाव्या. मत विचारू नये. बरी वाटल्यास त्याच्या चेहऱ्यावर दिसेल. 'कशी आहे?' 'बरी आहे का वाईट?' असले अडचणीत टाकणारे प्रश्नही विचारू नका.

अकाली प्रसिद्धी घातक ठरते. उत्तेजनासाठी थोडी प्रसिद्धी हवी, पण त्यानेच कवितेत वाढ होईल असे समजू नका. चांगले असेल तर कधी ना कधी प्रकाशात येईल, कौतुक होईल. काव्यात्म वृत्तीवर ह्या बाहेरच्या गोष्टींचा परिणाम होऊं देऊ नका.

स्वतःशी संथपणे कविता वाचून ( गाऊन नव्हे ) पाहावी. आपले कानही सांगतात— कांही खटकले तर. एकाच कवितेत एकच वृत्त वा एकच छंद अखेरपर्यंत असेल असेही नाही. अंतऱ्यासाठी वा सबंध चरणासाठी आणखी दुसरे वृत्त, जाति वा छंद वापरावेही लागते. मुक्तछंदात केवळ लय सांभाळून लिहिले जाते. त्यांत काव्य नसेल तर लिखाण उणे पडते.

लिहावेसे वाटेल तेव्हा लिहीत जावे—सगळेच प्रसिद्ध करण्यामागे लागू नये. लिहिण्याची ऊर्मि पुढे एकाएकी आटते आणि केवळ सफाई उरते. शुद्धलेखन, गणमात्रा, वृत्त, जाति या गोष्टी गौण आहेत. त्या शिकता येतील, परंतु लिहिण्याचा जोष टिकवणे साऱ्यांनाच शक्य नसते. म्हणून भावनांचा ताजेपणा, सच्चेपणा व उत्कटपणा सदैव जपावा.

वरील सर्व विवेचनाचा फायदा ज्यांना लिहिण्याची तळमळ आहे त्यांना होईल.

इतरांनी, बघू तर खरे म्हणून लिहिण्याचा प्रयत्न करावा. कुणी सांगावे, एखादेवेळी लयही लागेल. सारेच कवि होऊ शकत नाहींत, पण रसिक होऊ शकतात. कविता लिहिण्याचा प्रयत्न करणे ही कविता समजण्याची एक जवळची पायरी आहे. त्यामुळे आस्वाद घेण्याचे सामर्थ्य वाढेल, दिशा कळेल, जीवनात आगळा अनुभव येईल. आणि हेही काही थोडे नाही !

वाचनासाठी आपण आपणास आवडलेल्या कविता निवडाव्यात. आपण समरस झालो तर इतर समरस होणार हे उघड आहे. कवि रॉबर्ट फ्रॉस्टच्या मते 'कवितेचा प्रारंभ आनंदांत होतो आणि तिचा शेवट ज्ञानात होतो.' आनंदातून सत्य मिळवण्यासाठीं प्रत्येकाने कविता-लेखनाचा आणि वाचनाचा अनुभव घ्यायलाच हवा.

### क वि ता वा च न

आपण कविता वाचतो तेव्हा कवि बनतो असे म्हणतात, म्हणजे नक्की काय घडते? आपण शब्दांमार्फत कवीचा अनुभव मिळवतो, ते जीवन जगतो. शब्दरचनेच्या मदतीने कवीने आपल्या अनुभवावर ताबा मिळवला तोच ताबा आपण वाचनाने मिळवून सात्त्विक आनंद मिळवत असतो.

कवितेचे वाचन वा श्रवण हाही एक आगळा अनुभव आहे. ( कवितेचे गायन ह्या विषयाची चर्चा इथे करायची नाही. ) चांगल्या कवितेच्या चांगल्या वाचनाने श्रोते तन्मय होतात.

ज्यांच्यासाठी कविता वाचणार त्यांच्या आवडी, त्यांचे ज्ञान, त्यांचा अनुभव लक्षांत घ्या. दिलेल्या वेळात प्रस्तावनेसह किती कविता होतील ते ठरवा. त्यासाठी घरी आधी घड्याळ लावून वाचन करा. कविता निवडताना वृत्त, रस आणि कल्पना यात प्रत्येक कविता वेगळी असेल असे पाहा.

प्रत्येक कविता वाचण्यापूर्वी दोनतीन वाक्यात प्रस्तावना करावी, भूमिका मांडावी. हे नेहमीच आवश्यक असेल असे नाही. कवितेचे तात्पर्य वा सारांश सांगू नये. ('उन्हाळ्याच्या सुट्टींत बाकांची स्थिति काय होईल हे पाहू;' 'शाळेचा निरोप घेताना नाना विचार मनात येतात. एका मुलाच्या मनातील हे वेगळे विचार ऐका.' अशाप्रकारे आरंभ करता येईल.)

एकदा वाचन सुरू झाल्यावर मधेच थांबून स्पष्टीकरण करणे, एखादा संदर्भ देणे ह्या गोष्टी टाळाव्यात. सुटा कागद थरथरतो म्हणून शक्य तो वहीच हातात घ्या. एकवार सर्व श्रोत्यांवर नजर फिरवून कविता वाचू लागा .स्वच्छ, स्पष्ट सुरात वाचू लागा. माईक समोर असल्यास दीड वीत अंतरावरून त्याच्यावर आवाज फेका. हळू आवाजात बोलायचे असल्यास अंतर थोडे कमी करा.

भावनेला अनुकूल असा आवाज ठेवा. पण एकदम रडका, चिडका, आरडाओरड केल्यागत आवाज नको. शब्द कुठेही तोडू नका. कवितेची ओळ आणि अर्थ नेहमी

एकाच वेळी पुरे होतील असे नाही. कधी अर्धी ओळ, कधी एक ओळ, कधी दीड ओळ वाचावी लागेल. कधी दोनतीन शब्दांचा समूह वाचून विराम घ्यावा लागेल. हे सगळे थांबणे आधी ठरवून घ्या. काही वेळा काही शब्दसमूह दोनदा–तीनदाही म्हणणे आवश्यक वाटेल. क धी ग तीं ती ल सं थ ता जा ण-वू न दे ण्या सा ठी ती ओ ळ सा व का श वा चा वी ला गे ल. कधीधांदलघाईव्यक्तकरण्यासाठींप्रत्येकशब्दभरभरउच्चारतजावे लागेल. स्वराचे चढउतार महत्त्वाचे. त्यांतूनच कवितेतील भावनांची आंदोलने जाणवतात. रुसवा, हास्य, मिस्किलपणा, खेद, संताप अशा नाना छटा स्वरातून हळुवारपणे व्यक्त व्हाव्यात. नाटकातील पात्राप्रमाणे चढ्या आवाजाची गरज नाही; अभिनय नकोच. शब्दाचा अर्थ श्रोत्यांपर्यंत भिडवणे हे तुमचे काम.

कविता पाठ असल्यास चांगली. तरीही ओझरती नजर टाकण्यासाठी हाताशी कविता असावी. म्हणजे फजिती होत नाही आणि आत्मविश्वासही जात नाही. शब्दा-शब्दांतील कालावधीपेक्षा चरणाचरणांतील कालावधी अधिक असेल. कडव्याकडव्यातील कालावधी त्याहून अधिक असेल. कांही वेळा जाणूनबुजून शांतता ठेवायची असेल. कधी एखाद्या शब्दावर जोर द्यायचा असतो.

काही कवितांचे सामूहिक वाचन परिणामकारक होते. धृपद दोघातिघानी म्हणावे. अंतरा काहीनी म्हणावा.( उदाहरणार्थ ‘ बाकांचे गाणे ’—एकेक कडवे एकाने म्हणावे. मात्र धृपद सर्वांनी म्हणावे. ) एकाहून जास्त ‘ आवाज ’ असल्यास वाचन नक्की श्रवणीय होईल.

कविता वाचनानंतर कुणी ‘ वा ह वा ’ म्हटले नाही, टाळ्या मिळाल्या नाहीत, हात-रुमाल उडवले गेले नाहीत तरी नाउमेद होऊ नका. उजळलेल्या चेहऱ्यावर नक्की पावती मिळते. कविता ‘ अपील ’ झाल्यावर पुष्कळसे तृप्त होऊन शांत राहतात. कोणत्याही परिस्थितीत श्रोत्यांवर चिडू नका, त्रस्तता दाखवू नका. अरसिकासमोर कवितावाचन करण्याची पाळी आली तरीही धैर्याने उभे राहा. कुणी सांगावे, त्यातले काही रसिक बनतीलही !

वा. क्र. १५५०९

REFBK-0015571
REFBK-0015571